**Punya Nagari,** 20 January 2009

# अॅटम टेक्नॉलॉजी - प्रवासी कंपन्यांची युती

मुंबई, दि. १९ - अॅटम टेक्नॉलॉजीज कंपनी मोबाईल पेमेंट करण्याचे एम-पेमेंट माहिती तंत्रज्ञान पुरवण्यासाठी सुमारे २५ ट्रॅव्हल्स कंपन्यांसोबत करार करण्याच्या तयारीत आहे. प्राय: हे करार विमान वाहतूक कंपन्या, टूर ऑपरेटर, ऑनलाईन ट्रॅव्हल एंजंट आणि हॉटेल्स यांना मोबाईल पेमेंट सोल्यूशन्स पुरवण्यासाठी करण्याची कंपनीची इच्छा आहे. सध्या फ्लाय क्रेझी, ऑक्सवर्ड ट्रॅव्हल्स, तिकिटवाला इत्यादी कंपन्या अॅटम टेक्नॉलॉजीज कंपनीच्या मोबाईल पेमेंट सेवेचा वापर करीत आहेत. अॅटम टेक्नॉलॉजीज कंपनीने प्रमुख ट्रॅव्हल्स कंपन्यासोबत करार करण्याप्रमाणेच मार्च २००९ पर्यंत एम-पेमेंट सेवेचे दहा लाख ग्राहक जोडण्याचा संकल्पसुध्दा सोडला आहे. तसेच मार्च ०९ पर्यंत श्रीलंका बाजारपेठेत मुसंडी मारण्याची योजनादेखील आखली आहे.